


RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-03 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 30 April 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ०३ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

# काश्मीरमधील 50 पर्यटन स्थळं बंद

## पहलगाम हल्ल्यानंतर जम्मू काश्मीर सरकारचा मोठा निर्णय

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

पहलगाम हल्ल्याचा तो दिवस भारतीयांच्या मनावर कोरला गेला आहे. हा दिवस कधीही विसरता येणार नाही. या हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांना प्राण गमवावे लागले. निरपराध पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. या घटनेचा जगभरातून निषेध नोंदवला जातो आहे. तसंच पाकिस्तानला धडा शिकवा अशी मागणीही केली जाते आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दहशतवाद्यांना ते कल्पनाही करु शकणार नाहीत अशी शिक्षा केली जाईल असं म्हटलं आहे. तसंच मागील सात दिवसात मृत्यूच्या मन विषण्ण करणाऱ्या कहाण्याही समोर आल्या आहेत. धर्म विचारुन दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांना ठार केलं. आता या सगळ्यावर ठोस उपाय योजना केल्या पाहिजेत अशी मागणीही सर्व स्तरातून होते आहे.

**काश्मीरमधली ५० पर्यटन स्थळं बंद, पहलगाम हल्ल्यानंतर जम्मू काश्मीर सरकारचा मोठा निर्णय**

जम्मू काश्मीर सरकारने पहलगाम हल्ल्याच्या सातव्या दिवशी मोठा निर्णय घेतला आहे. काश्मीरमधली ५० ठिकाणं ही पर्यटकांसाठी बंद करण्यात आली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेतला आहे. पुरेशी सुरक्षा नसल्याने ही पर्यटनाची ठिकाणं बंद करण्यात आली आहेत. या ठिकाणांमध्ये वेरीनाग, बंगस खोरं, युसमार्ग रिसोर्ट यांचा समावेश आहे. ज्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था चोख आहे अशी ठिकाणी खुली राहतील असं सरकारने म्हटलं आहे

**१ मे पासून भारतीय संरक्षक दलांमध्ये होणार महत्त्वाचे बदल**

एअर मार्शल एन. तिवारी भारतीय हवाई दलाचे नवे उपप्रमुख होणार. एअर मार्शल आशुतोष दीक्षित यांची सीआयएससी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. प्रतीक शर्मा भारतीय लष्कराच्या उत्तरी कमांडचे नवे कमांडर असतील



**पर्यटकाने झिपलाईनवर असताना नकळत कॅमेरात कैद केला हल्ल्याचा थरार**

पहलगाम हल्ल्याचा थरार एका पर्यटकाच्या व्हिडीओत कैद झाला आहे. ऋषी भट्ट असं या पर्यटकाचं नाव आहे. पहलगाम हल्ल्याला सात दिवस पूर्ण झाल्यानंतर हा व्हिडीओ समोर आला आहे. पहलगाम या ठिकाणी दहशतवाद्यांनी गोळीबार केला आणि २६ निष्पाप पर्यटकांना जीव गमावावा लागला. या घटनेचा देशभरातून आणि जगभरातून निषेध नोंदवण्यात आला. दरम्यान हा नवा व्हिडीओ आता समोर आला आहे. ऋषी भट्ट या पर्यटकाचा हा व्हिडीओ आहे. त्याने सांगितलं " मी पहलगामला झिपलाईनवर होतो. त्यावेळी मी व्हिडीओ अगदी सहज म्हणून घेतला. मला माहीतही नव्हतं की दहशतवाद्यांकडून गोळीबार सुरु झाला आहे. पण ती घटना माझ्या मोबाइल व्हिडीओत नकळत कैद झाली. असं ऋषी भट्टने इंडियन एक्स्प्रेसला सांगितलं. ऋषी भट्ट यांचा अहमदाबादमध्ये इव्हेंट मॅनेजमेंटचा व्यवसाय आहे. भट्ट त्यांच्या कुटुंबासह १६ ते २७ एप्रिल या कालावधीसाठी काश्मीरला सुट्टीसाठी आले होते. त्यावेळी २२ तारखेला म्हणजेच मागच्या मंगळवारी हा हल्ला झाला. ऋषी भट्ट यांच्यासह त्यांची पत्नी भक्ती आणि मुलगा प्रीतही होते."

**पहलगाम हल्ला धक्कायक, उपाय योजण्यासाठी विशेष अधिवेशन बोलवा-मल्लिकार्जुन खरगेंचं मोदींना पत्र**

पहलगामचा दहशतवादी हल्ला देशाला हादरवणारा आहे. पहलगाम हल्ल्यावर उपाय योजना करण्यासाठी एक विशेष अधिवेशन बोलवलं जावं अशी मागणी काँग्रेस पक्षातर्फे करण्यात येते आहे. मी अध्यक्ष म्हणून आपल्याला ही विनंती करतो आहे की संसदेचं विशेष अधिवेशन बोलवा आणि हल्ल्यात ज्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांना न्याय कसा मिळेल याची चर्चा करा. असं पत्र काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लिहिलं आहे.

**पाकिस्तानकडून सीमारेषेजवळ गोळीबार, भारताने दिलं चोख प्रत्युत्तर**

पाकिस्तानकडून सीमारेषेजवळ गोळीबार करण्यात आला. या हल्ल्याला भारताने दिलं चोख प्रत्युत्तर दिलं आहे. पाकिस्तानच्या कुरापती काही थांबताना दिसत नाहीत. मात्र भारताकडून पाकिस्तानला जशास तसं उत्तर दिलं जातं आहे.

**दहशतवाद्यांना शोधण्याची मोहीम सुरक्षा दलांकडून अधिक तीव्र**

पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांचा शोध घेण्याची मोहीम तीव्र करण्यात आली आहे. सुरक्षा दलांनी आता स्थानिकांची मदत घेऊन आणि तांत्रिक मदतीद्वारेही दहशतवादी कुठे लपून बसले आहेत हे शोधण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

# महायुतीत वादाची ठिणगी?

## "शेवटची लढाई लढायची वेळ आली तरीचालेल आम्ही ती लढणार"

## रायगडच्या पालकमंत्री पदावरून शिंदें गटाच्या आमदाराचा इशारा

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

महायुती सरकारमधील रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदासाठी शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते आग्रही आहेत. पण जेव्हा पालकमंत्री पदाची यादी जाहीर झाली होती, तेव्हा रायगडचं पालकमंत्री पद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या आदिती तटकरे यांना तर नाशिकचं पालकमंत्री पद भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्याकडे देण्यात आलं होतं. मात्र, यानंतर दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्थगिती दिली होती. त्यामुळे हा तिढा अद्यापही सुटलेला नाही. यातच आता शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार महेंद्र दळवी यांनी महायुतीला एक सूचक इशारा दिला आहे. 'आम्हाला पालकमंत्री पदासाठी शेवटची लढाई लढायची वेळ आली तरी चालेल. आम्ही ती लढाई लढणार', असा इशारा महेंद्र दळवी यांनी दिला आहे.

**आमदार महेंद्र दळवी काय म्हणाले?**

मंत्री भरत गोगावले यांची पालकमंत्री पदाची संधी हुकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे, असा प्रश्न आमदार महेंद्र दळवी यांना विचारला असता ते म्हणाले, "शिवसैनिक आणि आमदार म्हणून खऱ्या अर्थाने भरत गोगावले यांच्या पालकमंत्री



पदासाठी रायगडकरांना अपेक्षा आहे. आदिती तटकरे यांना पालकमंत्री म्हणून घोषित झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्या निर्णयाला स्थगिती दिली. आता १ मे रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम रायगडमध्ये आदिती तटकरे यांच्या हस्ते होत आहे. आम्ही याला विरोध करणार आहोत", असं आमदार महेंद्र दळवी यांनी म्हटलं आहे. " भरत गोगावले यांच्या रुपाने आम्हाला पालकमंत्री पद मिळालं पाहिजे. खरं तर भरत गोगावले यांनी त्याग केलेला आहे. आता त्यांच्याकडे मंत्रिपद आहे, त्यामुळे त्यांना पालकमंत्री पद मिळायला पाहिजे ही अपेक्षा आहे. त्यामुळे रायगडबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल अशी आम्हाला अपेक्षा आहे. खरं तर तटकरे कुटुंबाला संपूर्ण रायगडमधून विरोध आहे. आदिती तटकरे यांच्या पालकमंत्री पदाला स्थगिती मिळालेली आहे, त्यामुळे आम्ही आशावादी आहोत", असंही महेंद्र दळवी यांनी म्हटलं. "रायगडने जो जनाधार दिला तो आम्हाला दिलेला आहे. त्यामुळे गोगावले पालकमंत्री व्हायला पाहिजेत. तटकरे कुटुंबाचा इतिहास पाहिला तर त्यांचं नेहमी सर्व आम्हालाच पाहिजे असं असतं. पण आम्ही यावेळी असं स्वीकारणार नाही, मग भलेही यासाठी शेवटची लढाई लढायची वेळ आली तरी चालेल. आम्ही ती लढाई लढणार", असा इशारा महेंद्र दळवी यांनी दिला आहे. महायुतीत शिवसेनेवर अन्याय होतोय का? असं विचारलं असता महेंद्र दळवी म्हणाले, " नाशिक आणि रायगडमध्ये फरक आहे. पण नेहमी तटकरे कुटुंबच का? भरत गोगावले हे सर्वसामान्य व्यक्ती आहेत, पण याचा फायदा कोणी घेत असेल तर रायगडची जनता हे सहन करणार नाही. आम्ही देखील अन्याय सहन करणार नाही. रायगड हा रस्त्यावर उतरणारा मावळा आहे. त्यामुळे आम्हाला काही फरक पडणार नाही. रायगड हा उठाव करणारा जिल्हा असल्यामुळे उठाव तर नक्की होणार" , असंही त्यांनी म्हटलं आहे.

# जि. प. मोखाडा (पवारपाडा) शाळेचे मुख्याध्यापक श्री वासुदेव दयाराम पाटील यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

श्री वासुदेव दयाराम पाटील (प्र. केंद्रप्रमुख) पदवीधर शिक्षक जिल्हा परिषद शाळा पवारपाडा केंद्र. पोशेरा ता. मोखाडा जि. पालघर. हे पदवीधर शिक्षक पदावरून ३५ वर्ष तीन महिने पाच दिवस प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाले. त्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा मा.आमदार श्री सुनील भाऊ भुसारा साहेब विक्रमगड विधानसभा. यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. यावेळी श्री वासुदेव पाटील सरांचे जिवलग मित्र श्री ईश्वर पाटील यांनी त्यांच्या शिक्षणापासून तर नोकरी लागते तोवर जीवन प्रवास भावनिक साथ घालत कथित केला. श्री पाटील सरांनी आपल्या एकदम गरीबीच्या व हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले तसेच आपल्या आई-वडिलांच्या कृपा आशीर्वादाने नोकरी सुद्धा लागली. पाटील सर हे आपल्या आई-वडिलांवर व बहिण, भाऊ, भाचे वर अति नितांत प्रेम करणारे निर्मळ व प्रेमळ व्यक्तिमत्व मोखाड्यासारख्या अति दुर्गम भागात ३५ वर्ष त्यांनी सेवा अगदी गावातील लहान थोरांपासून सगळ्यांची मिळून मिसळून प्रेमाने राहून आपला जीवन प्रवास सुरळीत पार पाडला. "त्यांचे नाव जरी वा द









पाटील असेल परंतु सरांनी आपल्या कार्यकाळात कधीही कुणाशी वाद विवाद केला नाही" असे त्यांच्या मित्रांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. तसेच मोखाडा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री अमोल पाटील साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना असे सांगितले की पाटील सरांनी आमच्या डोंगर दर्या खोऱ्यातील आदिवासी भागात अतिशय चांगल्या प्रकारे नोकरी केली व त्यांच्या शिक्षणातून त्यांनी आमची मुलं चांगल्या प्रकारे घडवली व आज ती उच्चशिक्षित होऊन चांगल्या पदावर नोकरी करत आहेत. तसेच पाटील सरांच्या खांद्याला खांदा लावून सौ संगीता ताई यांनी सुद्धा सरांना मोलाची साथ दिली पाटील मॅडम यांनी शिवण क्लास करून आपल्या मुलांचे शिक्षणाला हातभार लावला व सरांना त्यांनी असा एक चांगला सल्ला दिला की तुम्ही तुमच्या शाळेतील मुलांना चांगलं शिक्षण द्या तरच आपली मुलं चांगली शिकतील! आणि खरोखरच पाटील सरांनी अतिशय दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना चांगलं शिक्षण देऊन उच्चशिक्षित केले. त्याचप्रमाणे त्यांची दोघी मुलं, दोघी सुना सुद्धा आज नामांकित कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर होऊन चांगल्या पॅकेजवर नोकरी करत आहेत. तसेच त्यांचे मित्र ईश्वर पाटील सरांनी वासुदेव व ईश्वर या बाल मित्रांचे बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनियुक्त सरपंच मनोहर नवले साहेब होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. आमदार श्री सुनील भाऊ भुसारा, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाशजी निकम, नगराध्यक्ष अमोल पाटील, जि. प.सदस्य हबीब शेख, सारिका ताई निकम, कुसुमताई झोले, युवराज गिरधरे, प्रदीप जी वाघ उपसभापती मोखाडा, अनिल बंडू, लक्ष्मीताई भुसारे, गटशिक्षणाधिकारी मोखाडा श्री अक्षय पवार, श्री वसंत महाले, किरण शिंदे, भरत गारे, सुनिता ताई पवार, पोशेरा केंद्रातील सर्व शिक्षक वृंद व शाळा व्यवस्थापन समिती पवार पाडा तसेच आप्तेष्ट, नातेवाईक, भाऊबंद, मित्रमंडळी यांच्या उपस्थितीने व सहकार्याने पाटील सरांचा सेवापूर्ती गौरव सोहळा अति उत्साहात पार पडला.

# पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल चैत्राम पवार यांना दिल्ली येथे राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------

साक्री तालुक्यातील बारीपाडा गावातील पर्यावरण प्रेमी श्री चैत्रम पवार यांना दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात सोमवारी संध्याकाळी महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्म यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री चैतराम पवार हे वनवासी कल्याण आश्रमाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत. चैत्राम पवार यांना प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पुरस्कार घोषित झाला होता. पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी सन १९९० च्या





दशकात संयुक्त वन व्यवस्थापन प्रभावीपणे राबवले होते. त्यांनी केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्र मध्ये आणि गुजरात मध्ये अनेक गावांचे जीवनमान उंचावले शिवाय पर्यावरणाचे संवर्धन झाले होते. त्यांना महाराष्ट्र सरकारचा पहिला वन भूषण पुरस्कार मिळाला होता. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील दुर्गम आदिवासी बारीपाड्याची स्थिती बदलली आहे. बारीपाड्या गावाचे नाव संपूर्ण देशात आणि जगात उंचावले आहे. पद्मश्री पुरस्कार वितरण सोहळ्यात गावातील व परिसरातील त्यांच्यावर प्रेम करणारे नातेवाईक मित्रमंडळी उपस्थित होते. तसेच भारत देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी व संरक्षण मंत्री अमित शहा व मंत्रिमंडळातील सर्वच मंत्र्यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा अगदी उत्साहात आणि आनंदात पार पडला.

संपादकीय

# 100 दिवसांतील शंभरी!

ऊटपटांग निर्णय, प्रशासकीय हडेलहप्पी आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवरील धरसोड यांमुळे ट्रम्प यांची लोकप्रियता अन्य अध्यक्षांपेक्षाही अधिक घसरली... जगातील एकमेव महासत्तेच्या प्रमुख पदावर डोनाल्ड ट्रम्प आरूढ झाले त्यास आज २९ एप्रिल रोजी १०० दिवस होतील. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांस पराभूत केल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकी रिवाजानुसार २० जानेवारीस अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. त्या वेळी 'लोकसत्ता' संपादकीयाने त्यांच्या झंझावाती प्रारंभाचे वर्णन 'वॉशिंग्टनची कुऱ्हाड' (२२ जानेवारी) असे केले. ते किती रास्त होते ते नव्याने सांगण्याची गरज नाही. या वॉशिंग्टन-स्थित 'कुऱ्हाडी' ने जागतिक अर्थकारण, समाजकारण यांवर सावली धरणाऱ्या वृक्षांची कत्तल इतक्या जोमाने केली की त्यानंतरच्या वणव्यात हा कुऱ्हाडीचा दांडाच आता बळी पडतो की काय अशी स्थिती निर्माण होताना दिसते. या १०० दिवसांत ट्रम्प यांनी जे करून दाखवले ते अद्वितीयच. एरवी समर्थकांचे रूपांतर इतक्या तातडीने विरोधकांत करून दाखवणे हे तसे येरागबाळ्याचे काम नव्हे. ट्रम्प हे अशा सामान्य नेत्यांतले नसल्याने त्यांना हे शक्य झाले. हे यश इतके देदीप्यमान आहे की ते पुन्हा निवडून यावेत यासाठी एके काळी देव पाण्यात घालून प्रतीक्षा करणाऱ्यांची वळलेली बोबडी बराच काळ तशीच राहील असे दिसते. तथापि कडव्या टीकाकारांसही त्यांच्यातील एका दुर्मीळ गुणाचे कौतुक करावेच लागेल. माघार घेणे हा तो गुण. आज पहिल्या शंभर दिवसीय धडाक्यातील एकही मोठा निर्णय असा नाही की ट्रम्प यांनी त्यापासून माघार घेतली नाही वा त्या भूमिकेत बदल केला नाही. त्यांच्या पहिल्या शतकदिन पूर्तीनिमित्ताने या माघारींचा आढावा घ्यायला हवा. तसेच ही वेळ त्यांच्यावर का आली त्या कारणाचाही स्पष्ट उल्लेख करायला हवा. यातील सगळ्यात ढळढळीत आणि पहिली भव्य माघार म्हणजे त्यांनी स्वत:च स्वत:चा लांबणीवर टाकलेला आयात शुल्क वाढीचा निर्णय. या निर्णयामुळे जगातील सर्व देशांची उत्पादने अमेरिकी बाजारात विकण्यासाठी अतिरिक्त शुल्क आकारले जाणे अपेक्षित होते. ही घोषणा झाली आणि अमेरिकी बाजारात जी घसरण सुरू झाली त्यामुळे ट्रम्प यांच्या सल्लागारांचे डोळे पांढरे झाले. जे अमेरिकन ट्रम्प यांच्या सत्तारोहणामुळे येऊ घातलेल्या 'अच्छे दिनां'कडे डोळे लावून होते त्यांनी आहे ते तरी राहणार की जाणार या भीतीने डोळे फिरवले. अखेर स्वत:च्याच निर्णयास ९० दिवसांची स्थगिती देण्याची वेळ त्यांच्यावर आली. त्याकडे 'होते असे कधी' असे म्हणून डोळेझाक करता आलीही असती. पण ट्रम्प यांनी या काळात आपल्या निर्णयांपासून माघारी जाण्याचा सपाटा लावला. ज्या शत्रुपक्षीय चीनवर त्यांनी २४५ टक्क्यांपर्यंत आयात शुल्क वाढवण्याची धमकी दिली त्याच चीनबाबत त्यांचा सूर नरमाईचा झाला. इतका की चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग अमेरिकेकडे ढुंकून बघण्यास तयार नसताना ट्रम्प यांच्यावर त्यांची आर्जवे करण्याची वेळ आली. तीच बाब अमेरिकेत आलेल्या परदेशी विद्यार्थ्यांबाबत. हजारो विद्यार्थ्यांना ट्रम्प यांनी 'चले जाव'चा आदेश दिला खरा. पण अमेरिकेचे यामुळे काय नुकसान होईल याचा अंदाज आल्यावर त्यातील निम्म्याहून अधिकांचा हा आदेश त्यांनी मागे घेतला. परदेशी कंपन्यांच्या परदेशातच बनवलेल्या मोटारींवर खच्चून आयात कराची घोषणा करणारे ट्रम्प नंतर हळूच मोटार उद्योगाचा अपवाद करते झाले. ही माघारमौज फक्त आर्थिक निर्णयांबाबतच दिसून आली असे नाही. मुत्सद्देगिरीतही तेच झाले. ज्या युक्रेनच्या झेलेन्स्की यांना युद्धखोर ठरवत व्हाइट हाऊसमधून अपमानित होऊन जावे लागले त्याच झेलेन्स्की यांची भलामण करण्याची वेळ ट्रम्प यांच्यावर आली. कारण? झेलेन्स्की यांना दूर सारत रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचा पत्कर घेणे राजकीयदृष्ट्या महाग पडेल याची त्यांना उशिरा का असेना झालेली जाणीव. सामान्य अमेरिकी नागरिक अनेक गुन्हे माफ करू शकतो. पण अमेरिकेत एका प्रमादास क्षमा नाही. रशियाची तळी उचलणारा अध्यक्ष अमेरिकी नागरिक सहन करू शकत नाहीत. हे आणि असे बरेच काही अवघ्या १०० दिवसांत घडले. याचा परिणाम त्यांच्या लोकप्रियतेवर झाला नसता तरच नवल. ऊटपटांग निर्णय, प्रशासकीय हडेलहप्पी आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवरील धरसोड वृत्ती यांमुळे ट्रम्प यांची लोकप्रियता झरझर घसरत असून पहिल्या १०० दिवसांत इतकी घसरण अनुभवणारे ते अलीकडच्या काळातील पहिले अध्यक्ष ठरतील. इतकेच नव्हे तर उठता-बसता ट्रम्प ज्यांना लाखोली वाहतात ते माजी अध्यक्ष जो बायडेन यांच्यापेक्षाही पहिल्या १०० दिवसांत ट्रम्प यांच्या लोकप्रियतेची अधिक धूप झाली असे ताज्या पाहण्यांतून दिसते. अध्यक्षपदी आरूढ झाल्यानंतर अवघ्या एक महिन्यात ट्रम्प यांचे समर्थक निम्म्यापेक्षा कमी होऊन ४७ टक्क्यांवर आले आणि आज १०० दिवसांचा टप्पा ते पूर्ण करत असताना हे प्रमाण ४२ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. या तुलनेत बायडेन याचा लोकप्रियता निर्देशांक पहिल्या १०० दिवसांत ५९ टक्के इतका होता. त्यांच्या तुलनेत स्वत:स कर्तबगार, धाडसी इत्यादी समजणाऱ्या ट्रम्प यांची घसरण फारच केविलवाणी. ट्रम्प यांच्यावर जनता रुष्ट होण्याची कारणेही लक्षात घ्यावी अशी. आपला उद्योगपती मित्र 'टेस्ला' कार आचरट इलॉन मस्क यांच्या सल्ल्याने ट्रम्प यांनी 'सरकारी कार्यक्षमता विभाग' सुरू केला आणि एकापाठोपाठ एक अनेक खात्यांत नोकरकपात सुरू केली. हे जनतेस रुचले नाही. प्रत्येकी १०० अमेरिकी नागरिकांतील ५५ जणांनी या नोकरकपातीविरोधात आपले मत नोंदवले. हा रोष इतका आहे की त्याचा फटका खुद्द मस्क यांच्या 'टेस्ला' कंपनीसही बसला. लोकांनी या कंपनीच्या मोटारी खरेदी करणे कमी केले. परिणामी कंपनीच्या नफ्यात तब्बल ७१ टक्क्यांची घट झाली. या फटक्याने मस्क यांच्याही डोळ्यासमोर काजवे चमकले आणि त्यांनी या सरकारी खात्यातून बाहेर पडण्याची भाषा सुरू केली. यापेक्षा अधिक अमेरिकी जनता ट्रम्प यांच्यावर नाराज आहे ती आयात शुल्काबाबतच्या धोरणाने. सणसणीत ६० टक्के नागरिकांनी ट्रम्प यांची ही आयात धोरणे चुकीची असल्याचे मत नोंदवले. अमेरिकेस पुन्हा (?) महान बनवण्याच्या नादात ट्रम्प अधिकाधिक जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती देशांतर्गत करून आत्मनिर्भर होऊ पाहतात. पण तसे केल्याने अमेरिकेत अनेक घटकांच्या किमती मोठ्या प्रमाणावर वाढणार असल्याने नागरिकांस संभाव्य चलनवाढीची, म्हणजेच महागाईची, चिंता आहे. त्यामुळे नागरिकांस हे धोरण मंजूर नाही. याचबरोबर अमेरिकी नागरिक ट्रम्प यांच्यावर यापेक्षाही अधिक नाराज दोन बिगर-आर्थिक कारणांमुळे आहेत. एक म्हणजे ट्रम्प यांची सरकारी उच्चपदस्थांवर असलेली भिस्त आणि न्यायालयाप्रति ते सातत्याने दाखवत असलेला अनादर. पाहणीतील ५१ टक्के नागरिकांस ट्रम्प यांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या मतांस इतकी किंमत देणे पसंत नाही. मंत्रिमंडळातील राजकीय सहकाऱ्यांपेक्षा आपला अध्यक्ष नोकरशहांवर अधिक विसंबून आहे हे बहुसंख्यांस आवडलेले नाही. तसेच सर्वाधिक म्हणजे ७५ टक्के नागरिकांनी ट्रम्प यांचा न्यायालयांबाबतचा अनुदार दृष्टिकोनही अस्वीकारार्ह ठरवला. त्यातही मुद्दा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करण्याचा असेल तर ८० टक्के नागरिकांनी या पाहणीत ट्रम्प यांच्या वागण्याचा निषेध केला. तेव्हा आपली लोकप्रियता झपाट्याने घसरू लागल्याचे पाहून ट्रम्प यांस भान आले आणि आपल्याच भूमिकांपासून माघार घेण्याची वेळ त्यांच्यावर आली. अशा तऱ्हेने आपल्या बोलघेवड्या नेत्यावर जागरूक अमेरिकी लोकशाहीने पहिल्या १०० दिवसांतच शंभरी भरल्याची वेळ आणली. ही घसरण ट्रम्प कशी रोखतात ते आता पाहायचे.




# नाशिक विभागात एस टी कामगार सेनेचा झंझावाती दौरा; सरचिटणीस मा. हिरेन रेडकर यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

महाराष्ट्र एस टी कामगार सेना नाशिक विभाग मध्ये येत्या ८ मे २०२५ रोजी मा. हिरेन रेडकर सरचिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली मा. प्रदीप धुरंधर साहेब कार्याध्यक्ष एस टी कामगार सेना यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक विभागात दौरा आयोजित करण्यात आलेला आहे. दरम्यान येवला आगारातील कार्यक्रम आटोपल्यावर नाशिक विभागीय कार्यलयात आयोजित बैठकीला शिवसेना उपनेते मा. सुधाकर भाऊ बडगुजर, शिवसेना नाशिक जिल्हा प्रमुख मा. डी जी सुर्यवंशी, महानगर प्रमुख मा. विलास अण्णा शिंदे, संघटक सचिव मा. सुभाष जाधव एस टी कामगार सेनेचे उपाध्यक्ष मा. किरण भाऊ बिडवे, प्रदेश सचिव मा. शामभाऊ इंगळे, विभागीय अध्यक्ष भास्करराव उगले यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे कळविण्यात आले आहे यावेळी सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत नूतन वार्ता फलकाचे उदघाटन देखील संपन्न होणार आहे.




**संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा खालीलप्रमाणे आहे**

दिनांक ७ मे २०२५ रोजी सरचिटणीस मा. हिरेन रेडकर व केंद्रीय कार्यकारीणी येवला आगारात संध्याकाळी ६.०० वाजेला भेट देतील तेथील कामगारांच्या व्यथा आणि समस्या समजावून घेतील त्यानंतर दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी दिनांक म्हणजेच दिनांक ८ मे २०२५ गुरुवार रोजी विभागीय कार्यालय नाशिक येथे सकाळी १०.३० वाजता बैठक संपन्न होईल असे नाशिक विभागीय कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. या प्रसंगी सर्व आगार निहाय अध्यक्ष सचिव सर्व पदाधिकारी यांनी सदर दौऱ्यास व त्यानंतर होणाऱ्या बैठकीस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे. नाशिक येथे आल्यानंतर वार्ता फलकाचे उदघाटन करण्यात येईल आणि त्यानंतर शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे दुपारी १२ वाजता सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत विभागीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे या बैठकीत कामगाराचे प्रलंबित प्रश्न व नूतन कार्यकारणीची निवड याबाबत विचार विनिमय करून त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे असे नाशिक विभागीय पदाधिकारी यांच्यातर्फे काढलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. बैठकीला संपूर्ण नाशिक विभागातून सर्व पदाधिकारी आणि सभासद बंधू बघिनी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# रेशनकार्ड धारकांना ई . के.वाय सी करण्यासाठी ३० एप्रील शेवटची संधी

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत शिधापत्रिका धारकांना ई केवायसी करण्यासाठी शेवटची ३० एप्रील मुदत दिलेली आहे . या मुदतीत केवायसी न केल्यास सदर शिधापत्रिक धारक लाभार्थ्यांचा धान्य पुरवठा बंद करण्यात येईल असे जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने सांगण्यात आले . नाशिक जिल्ह्यात आतापर्यंत ८५ % च्या आसपास नागरिकांनी ई




केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे . केंद्र सरकारतर्फे राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना अंतर्गत अंत्योदय व प्राधान्य रेशन कार्ड धारक कुटुंबांना मोफत गहू तांदूळ उपलब्ध करून देण्यात येतो. कोट्यावधी लाभार्थी या धान्याचा लाभ घेत असतात .त्यामुळे शासनाने या सर्व लाभार्थ्यांची माहिती अद्यावत करण्यासाठी ही ईकेवायसी नोंदणी करून घेण्याचे आवाहन केले आहे . परंतु लाभार्थ्यांची उदासीनता यामुळे वारंवार मुदतवाढ देण्याची वेळ शासनावर ओढवली आहे .नाशिक जिल्ह्यात अंत्योदय व प्राधान्य रेशन कार्डधारक लाभार्थ्यांची एकूण संख्या ३८ लाख ६२ हजार ४२ आहे त्यापैकी ८५ टक्के नागरिकांनी नोंदणी पूर्ण केली आहे .अद्यापही पंधरा टक्के नागरिकांची नोंदणी बाकी आहे दरम्यान किंवा आता ३०एप्रील ही शेवटची संधी शासनाने दिली आहे . यानंतर ईकेवायसी बाकी असलेल्या लाभार्थीचे धान्य शासन बंद करणार आहे .त्यामुळे अद्यापही नोंदणी न केलेल्या लाभार्थीने रेशन दुकानांमध्ये जाऊन किंवा मेरा ईकेवायसी या अँप च्या माध्यमा तून मोबाईल द्वारे ही प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन जिल्हा पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे .

# लोकशाही दिनाचे ५ मे रोजी आयोजन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार ५ मे २०२५ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे. या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व जिल्हा पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल. लोकशाही दिनाच्या दिवशी प्राप्त होणाऱ्या जनतेच्या तक्रारी, अडचणी एकत्रीतरीत्या समजावून घेऊन त्या शक्य तितक्या लवकर सोडविण्यात येतील, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी दिली आहे.



## वाचकांच्या लेखणीतून

# लेक वाचवा....

नारी अबला नाही सबला आहे . वंशाचा दिवा जरी नसली तरी वंशाची पणती नक्कीच आहे . त्याच वंशाच्या पणतीला आईच्या गर्भातच माराले जाते .का मारता तिला मातेच्या गर्भात? कारण ती एक मुलगी आहे .जन्म द्यायला आई पाहिजे ,राखी बांधायला बहीण ,गोष्टी सांगायला आजी पाहिजे मग मुलगी का नको ? आता कोठून सुरुवात करू तुम्हीच सांगा .जन्म देणाऱ्या माते पासून सुरूवात करू की तुमच्या मनगटावर राखी बांधणाऱ्या माझ्या मैत्रिणीपासून सुरुवात करू, की दहावीच्या परीक्षेला जाताना आणि अंगावर ऍसिड टाकल्या जाणाऱ्या माझ्या सखी पासून सुरुवात करू की,

**'स्त्री जन्मा तुझी कहाणी**
**हृदय अमृत नयनी पाणी '**

असे म्हणणाऱ्या माझ्या मावशी ,ताई पासून सुरुवात करू ....
ज्या देशात स्त्री ला देवी म्हणून पुजले जाते त्याचं देशात गर्भातच निष्पाप जीवाचा बळी घेतला जातो . स्त्रीभ्रूण हत्या कायद्याने गुन्हा आहे तरी देखील आज पण वंशाला दिवा पाहिजे या हट्टापायी अनेक कळया उमलण्या आधीच नष्ट केल्या जातात . त्याच स्त्रीभ्रूण हत्यावर एक छोटेसे काव्य ...
वादळी वारा वाहत होता, होती ती भयाण रात्र, त्या काळोखातील अघोरी हवेत येत होता आवाज विचित्र ते आवाज मात्र संकेत देत होती जाणाऱ्या सावलीचे, आणि बंधनात भरडल्या जाणाऱ्या माऊलीचे.त्या माऊलीनेच विझवला का तो चिमुकला दिवा, कारण गर्भातील जीव म्हणत होता आई जन्म मला हवा, वंशाला दिवा म्हणून मुलगा मात्र हवा, पण ....पहिली बेटी कचऱ्याची पेटी म्हणत का करता माझा हेवा मुलगी म्हणून जन्माला घालणं चूक असते का देवाची तोच मोठा अधिकार देऊन जागा देतो आईची का हिरावून घेता मग तिच्याकडून हक्क जग बघण्याचा.....
का मारता तिला मातेच्या गर्भात, कारण ती एक मुलगी आहे ...?

लेखिका
वैष्णवी रमेश भोर
मु. पो. रांजणी. तालुका.
आंबेगाव. जि. पुणे

# संसदीय लोकशाहीचे जनक....महात्मा बसवेश्वर
## ( महात्मा बसवेश्वर जयंती विशेष लेख )
## अक्षयतृतीया, ३० एप्रिल २०२५

बाराव्या शतकात सामाजिक परिवर्तनाचे वारे वाहू लागले.समाजातील

विषमता, अज्ञान, अंधश्रध्दा, जातीभेद,अस्पृश्यता, अनिष्ट रूढी परंपरा, चालीरीती, स्त्री पुरुष असमानता आदींमुळे समाज रसातळाला जात होता.यज्ञ, कर्मकांड यामुळे समाज पोखरला जात होता. या काळात महात्मा बसवेश्वरांसारखे क्रांतिकारक समाजसुधारक जन्माला आले व प्रबोधनाची नवी पहाट झाली. मध्ययुगाच्या बाराव्या तेराव्या शतकात धर्म सुधारण्याच्या माध्यमातून विद्रोहाची संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरविणारा कृतिशील समाज सुधारक म्हणून महात्मा बसवेश्वर यांचे कार्य प्रेरणादायी ठरते. वस्तूतः विद्रोही संकल्पना त्या काळात अस्तित्वात नव्हती. ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. तत्कालीन जीवनधारणेनुसार ज्याला बंडखोर म्हणता येईल अशी विचारधारा प्रस्तुत करणारा आणि प्रत्यक्ष कृतीतून ती सार्थ ठरविणारा एक खंदा कार्यकर्ता म्हणून महात्मा बसवेश्वरांची प्रतिमा लक्षात घ्यायला हवी. समता, मानवता, बंधुता, सामाजिक न्याय, लोकशाही विचार, स्वातंत्र्य, श्रमप्रतिष्ठा यांचे मूल्य समाजात रुजविण्यासाठी महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात सामाजिक परिवर्तन केले. "काय कवे कैलास!"श्रमशक्ती हीच खरी पूजा (W o r k i s workship ) याची शिकवण दिली. भिक्षा मागून उदरनिर्वाह करणे महात्मा बसवेश्वरांना मान्य नव्हते. कायक, दासोह यांना ते प्राधान्य देत रसातळाला जाणाऱ्या समाजाला



परिवर्तनाची गरज आहे हे ओळखून त्यांनी मानवता हाच खरा धर्म आहे. दया हे सर्व धर्माचे मूळ आहे अशी शिकवण देऊन अनुयायांना लिंगायत धर्माची दीक्षा दिली.यासाठी; जातीपातीचे कोणतेही बंधन नव्हते. कपाळाला भस्म, देहावर इष्टलिंग धारण करून सहज प्रवेश मिळत असे. त्यासाठी कोणत्या मंदिरात जाण्याची, कोणाला गुरू करण्याची गरज नव्हती. कोणत्याही धार्मिक विधीची कडक बंधने नव्हती.अग्रज ते अंतजा पर्यंत सर्वजण

बसवाणाच्या च्या शरण चळवळीत सामील झाले. त्यात दलित ,शूद्र, अस्पृश्य, अठरा पगड जाती धर्माचे अनुयायी होते. त्यांना सहजतेने भक्ती करण्याची संधी प्राप्त झाली.त्यात कोणते जप, तप, साधना ,व्रत,वैकल्ये नव्हती.पुरुषांना व स्त्रियांना अनुक्रमे शरण व शरणी या नावाने ओळखले जाई. या चळवळीचे रूपांतर लिंगायत धर्मात झाले. शरणांची पूर्वसश्रमीची जात नष्ट झाली. अग्रज व अंत्यज यांच्यात रोटी बेटी व्यवहार सुरू झाले. जातीच्या भिंती तुटून पडल्या बसवाच्या शरण चळवळरुपी वृक्षाला समता, मानवता, बंधुता , विवेक, दासोह, कायक यांची गोड फळे आली. शरण चळवळीत राहणारा वचनावर विश्वास ठेवणारा, नित्य सत्य ,शुद्ध आचरण करणारा,दासोह करणारा, लिंग जातीभेद न मानणारा मुक्त व्यक्ती म्हणजे शरण होय. बसवाच्या उपदेशाने व तत्वज्ञानाने सर्व प्रभावित झाले. शोषित ,दलित, अज्ञानी लोकांना महात्मा बसवेश्वर देवदूत वाटू लागला. दारू विकणारा हेडद माराय्या वाटसरुसाठी जलदुत बनला.त्याने तहानलेल्या माणसांसाठी पाणपोई सुरू केली. दारू विक्रीचा धंदा सोडून तो दूध ताक याची विक्री करू लागला. अनेक वेश्यांची मने परिवर्तित होऊन त्या सन्मार्गाला लागल्या. संसदीय लोकशाहीची सुरुवात अनुभव मंटपापासून झाली. समाजामध्ये अज्ञान दारिद्र्य असल्यामुळे विवेकी, सदाचारी वृत्तीचा अभाव होता. स्त्री पुरुष समानता नव्हती.स्त्रीला कमी लेखून तिला सन्मानाची वागणूक न देता दुय्यम स्थान दिले जाई. तिचे समाजातील अस्तित्व नगण्य होते. त्यासाठी स्त्री पुरुष भेदभाव न करता त्यांना समानतेची वागणूक मिळावी यासाठी महात्मा बसवेश्वर आणि अल्लम प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली अनुभव मंडपाची स्थापना केली. स्त्री पुरुष तसेच सर्वजाती धर्माच्या लोकांना मुक्तपणे कोणत्याही विषयावर चर्चा विचार मंथन करता यावे, यासाठी अनुभव मंटपाची स्थापना करण्यात आली. सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी त्यांना ज्ञानार्जनाची संधी मिळावी यासाठी महात्मा बसवेश्वर आग्रही होते. या अनुभव मंटपात एकूण ७७० शरण शरणी होत्या. त्यामध्ये ७०० पुरुष व ७० स्त्रिया यांचा समावेश होता. या ठिकाणी विविध क्षेत्रातील तत्त्वज्ञानी, धार्मिक पंडित, विद्वान,बुद्धीवादी अधिकारी वर्णी लावत असे. याच ठिकाणी हरळय्या चांभाराचा मुलगा शीलवंत तसेच मधुवारस ब्राह्मणाची मुलगी कलावती यांचा आंतरजातीय विवाह सर्वांच्या साक्षीने व संमतीने पार पडला. ते दोघे शरणशरणी इष्टलिंग धारक असल्यामुळे जातीपातीचा प्रश्नच नव्हता. तरी सनातनी राज व्यवस्थेला हा विवाह मान्य नव्हता. विरोधकांनी बिज्जल राजाला बसवाच्या या राज विरोधी कृत्याबद्दल राजाचे कान भरले.बसवेश्वराने राजद्रोह केला त्याची शिक्षा म्हणून हरळय्या तसेच मधूवारस यांना हत्तीच्या पायदळी देऊन मृत्यू दंडाची शिक्षा दिली. या घटनेने बसव अनुयायांमध्ये राजसत्तेविरोधात प्रचंड असंतोष व द्वेष निर्माण झाला. बिज्जल राजाच्या सैन्यांनी बसव अनुयायांना लक्ष्य करून त्यांना संपविण्याचे सत्र सुरू केले. त्यांच्यात तुंबळ युद्ध झाले. सैनिकांनी बसवाच्या वचन भांडारांना आगे लावली.तरी पण बसवाच्या शूरवीरांनी जीवावर उदार होऊन बरेच वचन साहित्य व ग्रंथ वाचविण्यात त्यांना यश आले. बसवेश्वर यांच्या या सामाजिक कार्यात त्यांच्या पत्नी गंगाबिका निलांबिका तसेच भगिनी नागाम्बिका यांचा मोलाचा सहभाग होता महिलांच्या उद्धारासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले त्यांची वचने म्हणजे माणुसकीचा सागर होता. समता नायक म्हणून बाराव्या शतकातील या महामानवाला जयंती निम्मित विनम्र अभिवादन!

-----------------------------

डॉ. श्यामसुंदर झळके,
सिन्नर ७४९८६७७८५३

# 17 वर्षीय युवकाचा खून; दोन विधिसंघर्षित बालकांसह 3 आरोपींना 4 तासांत अटक !

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



मागील महिन्यात संत कबीरनगर येथे अरुण राम बंडी यांच्या खुनातील संशयित करण उमेश चौरे (वय १७, रा. संत कबीरनगर झोपडपट्टी) याची सोमवारी (२८ एप्रिल) भरदिवसा निर्घृण हत्या करण्यात आली. कामटवाडे येथील स्मशानभूमीसमोर पाच ते सहा हल्लेखोरांनी करणवर दगड व फरशीच्या तुकड्यांनी हल्ला चढवून त्याचा जीव घेतला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. ८ मार्च रोजी मध्यरात्री संत कबीरनगरात अरुण बंडी याचा टोळक्याने खून केला होता. या प्रकरणात करणवर संशय घेत त्याला ताब्यात घेण्यात आले होते. अल्पवयीन असल्याने त्याची बाल निरीक्षणगृहात रवानगी झाली होती, मात्र १९ एप्रिल रोजी त्याला जामिनावर मुक्तता मिळाली होती. जामिनावर सुटल्यानंतर करणला त्याचा भाऊ आकाश याने शहर सोडण्याचा सल्ला दिला होता. मात्र, करणने हा सल्ला न ऐकता कामटवाडे सिडको परिसरातील मित्राकडे राहण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, संशयितांनी करणचा मागोवा घेत अखेर त्याचा काटा काढला. सोमवारी दुपारी सुमारास करण कामटवाडे स्मशानभूमी रोडवरून जात असताना हल्लेखोरांनी त्याला घेरून बेदम मारहाण केली. डोक्यात दगड व फरशीचे तुकडे मारून त्याला गंभीर जखमी करण्यात आले. गंभीर जखमी करण घटनास्थळीच मृत्युमुखी पडला. हल्लेखोरांनी हत्येनंतर घटनास्थळावरून पलायन केले. घटनेची माहिती मिळताच अंबड पोलिसांनी तत्काळ धाव घेतली. पोलिस उपायुक्त मोनिका राऊत आणि सहायक पोलिस आयुक्त शेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-१ आणि युनिट-२च्या पथकांनी तपास सुरू केला. याप्रकरणी गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस हवालदार प्रशांत मरकड आणि विशाल काठे यांना गुप्त माहिती मिळाली की, या गुन्ह्यातील आरोपी हे गंगापूर येथील आसाराम बापू पूल येथे थांबले आहेत. त्याप्रमाणे गुन्हे शाखेचे पथक त्यांच्या मागावर रवाना झाले. यावेळी पोलिसांची गाडी बघून संशयितांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. संशयित १) मोहन ज्ञानेश्वर वायचळे, वय १८ वर्षे ०६ महिने, रा. कामगार नगर, तिरंगा चौक, सातपुर, नाशिक, २) राहुल राजु गडदे, वय २० वर्षे, रा. आनंदवल्ली, रिक्षा स्टॅंड जवळ, नाशिक मुळ रा. नांदुर कोंडार, ता. नांदगाव जि. नाशिक ३) साहिल पिंटु जाधव, वय २१ वर्षे रा. आनंदवली, माळी वाडा, गंगापुर रोड, नाशिक व इतर दोन विधीसंघर्षीत बालक असे एकूण पाच आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस करता त्यांनी सराईत गुन्हेगार संशयित हर्षद पाटणकर याच्या सांगण्यावरून गुन्हा केल्याची कबुली दिली. संशयित आरोपींना पुढील कारवाई कामी अंबड पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे सदरची कामगिरी पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदिप मिटके, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट क.१ नाशिक शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, सहायक पोलीस निरीक्षक हिरामण भोये, पोलीस उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, सुदाम सांगळे, हवालदार प्रविण वाघमारे, प्रदिप म्हसदे, संदिप भांड, प्रशांत मरकड, विशाल काठे, नाझीमखान पठाण, योगीराज गायकवाड, रोहिदास लिलके, पोलीस नाईक विशाल देवरे, मिलींदसिंग परदेशी, पोलीस अंमलदार मुक्तार शेख, अमोल कोष्टी, राम बर्डे, महिला पोलीस अंमलदार अनुजा येलवे, चालक हवालदार सुकाम पवार, समाधान पवार यांनी केली आहे

# अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अन्वेषण प्रस्ताव ५ मे पर्यंत सादर करण्याची अंतिम मुदत

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------

सन २०११-१२ ते २०१७-१८ तसेच महाडीबीटी प्रणालीवरील सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्तीचे अन्वेषण प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करण्यास ५ मे २०२५ ही अंतिम मुदत आहे. यानंतर नांदेड जिल्ह्यातील कोणत्याही महाविद्यालयांचे प्रलंबित अन्वेषण प्रमाणपत्र प्रस्ताव निकाली काढण्यात येणार नाहीत. तसेच महाविद्यालयातील एकही मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांची राहील, असे आवाहन समाजकल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे. सन २०११-१२ ते २०१७-१८ तसेच महाडीबीटी प्रणालीवरील सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीतील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्तीचे अन्वेषण १५.१०.२०२४ च्या शासन निर्णयानुसार कळविण्यात आले होते. त्यानुसार महाडीबीटी प्रणाली मार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असली तरी पोर्टलवर अर्ज करतांना येणाऱ्या विविध अडचणीमुळे अनेक विद्यार्थ्यांचे विहित मुदतीत अर्ज भरूनही अर्ज Auto Reject होणे, एखाद्या वर्षी विद्यार्थ्यांच्या नियमित परीक्षा अथवा पुरवणी परीक्षेचा निकाल विहित वेळेत न लागल्याने अर्ज भरता न येणे अथवा अर्ज भरूनही पुढच्या वर्षीचा अर्ज नुतनीकरण करण्यास अडचण येणे. अशा बऱ्याच अडचणींचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागत आहे. सन २०१८-१९ ते २०२३-२४ या वर्षात ज्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी प्रणालीवर अर्जाची नोंदणी करण्यास अथवा नोंदणीकृत अर्ज मंजूर होण्यास अडचणी आल्या आहेत, अशा विद्यार्थ्यांना शासन निर्णयान्वये शिष्यवृत्ती ऑफलाईन पद्धतीने मंजूर करून अदा करण्यास राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील काही महाविद्यालयांनी अन्वेषण प्रमाणपत्र प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड येथे सादर केले होते. परंतु आर्थिक वर्ष २०२४-२५ संपून नवीन आर्थिक वर्ष २०२५-२६ सुरु झालेले आहे. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी प्रलंबित शिष्यवृत्तीचे अन्वेषण प्रमाणपत्र प्रस्ताव ५ मे २०२५ पर्यत सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नवऊर्जा देणारा आणि सशक्त भविष्य निर्मिती करणारा कार्यक्रम

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------




बेटर कॉटन इंडिया, लुपिन ह्युमन वेलफेअर अँड रिसर्च फाउंडेशन, एम एस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन चेन्नई यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे व नंदुरबार या दोन जिल्ह्यामध्ये 3 ट्रायकोकार्ड उत्पादन व जैविक संसाधन रिसोर्स सेंटर ची उभारणी करण्यात आलेली आहे. आत्ता हे सेंटर परिपूर्ण झाले आहेत व त्यांचं काम सुरू झालेले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना प्रेरित करण्यासाठी तसेच या सेंटर ची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचव्यासाठी उद्घाटनाचा कार्यक्रम धुळे येथे पार पडला.या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बोरसे सर ( संचालक आत्मा) , डॉ. पंकज पाटील सर ( शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र धुळे), डॉ. डी. यम. चौधरी सर ( शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र धुळे), डॉ. आर. गोपीनाथ ( वरिष्ठ शास्त्रज्ञ यम यस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन) डॉ. पी. मनिकांदन ( विषय तज्ञ यम यस स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन चेन्नई), सुनील सैंदाणे ( जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक लुपिन फाउंडेशन) कुशावर्त पाटील ( प्रकल्प समन्वयक लुपिन फाउंडेशन) हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रमावेळी शेतकरी हेल्पलाईन क्रमांक याची ही घोषणा करण्यात आली, जील्हातील प्रत्येक शेतकऱ्यांना घरबसल्या मोफत शेती सल्ल्यासाठी ही हेल्पलाइन काम करेल. त्याचबरोबर कापूस उत्पादन नियोजन पुस्तक, रोग व किडींची थोडक्यात ओळख करून देणाऱ्या माहिती पत्रिका ही प्रसारित करण्यात आल्या. कार्यक्रमासाठी उपस्थित असणाऱ्या सर्व लुपिन सारथी व शेतकऱ्यांनी या सर्व नवीन गोष्टीमुळे आनंद व्यक्त केला. कार्यक्रम व्यवस्थापनात महत्वाची भूमिका बजावली कुमार पानझडे( प्रकल्प समन्वयक स्वामिनाथन फाऊंडेशन) त्यांनी पुढाकाराने कार्यक्रमाचे नियोजन योग्य रित्या अखून कार्यक्रम यशस्वी केला. त्याचबरोबर टिटाने येथील निजामपूर बायो उत्पादन संसाधन केंद्र याचे उद्घाटन ही करण्यात आले. अध्यक्षांनी भाषणावेळी हे प्रकल्प जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नव्याने ऊर्जा देतील अश्या शब्दात कौतुक केले .

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# चैत्राम पवार पद्मश्री पुरस्काराने सन्मानित

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------------



चैत्राम पवार यांना आज २८ रोजी संध्याकाळी ६ वाजता दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात मा. महामहिम राष्ट्रपती द्रौपदीमुर्म यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. बारिपाडा येथील चैत्राम देवचंद पवार यांना प्रजासत्ताक दिनाच्या पुर्वसंध्येला पद्म पुरस्काराची घोषणा करण्यात आली होती. त्या पद्मश्री पुरस्कारांचे वितरण २८ रोजी संध्याकाळी दिल्ली येथे होणार आहे. त्यातील एक नाव आहे ते म्हणजे चैत्राम पवार यांनी पर्यावरण क्षेत्रात चांगले काम केल्याने त्यांचा कार्याचा गौरव म्हणून पद्म पुरस्कार देवून गौरव करण्यात आले आहे. १९९० च्या दशकात संयुक्त वन व्यवस्थापन प्रभावी पणे त्यांनी राबवले होते. त्यांनी केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्र आणि गुजरातमधल्या अनेक गावांचे जिवनमान होते. शिवाय पर्यावरणाचे संवर्धनही झाले होते. त्यांना महाराष्ट्र सरकारचा पहिला महाराष्ट्र वनभूषण पुरस्कार मिळाला होता.

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील दुर्गम असा बारीपाडा हा आदिवासींचा पाडा आहे. या पाड्याची १९९२ पूर्वीची परिस्थिती अतिशय बिकट होती. इथं सर्व काही उजाड होतं. समोर ओसाड माळरान होतं. पिण्यासाठी घोटभर पाणी मिळत नव्हतं. पाण्यासाठी तर वणवण करावी लागत होती. मात्र १९९२ नंतर या पाड्याचे चित्र पालटलं. चैत्राम पवार या पाड्याच्या मदतीला धावले. गावातले लोक रोजगारासाठी गाव सोडत होते. गावात मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होत होती. अशा वेळी पवार यांनी हे चित्र बदलण्याचा निर्णय घेतला. वन सरंक्षणासाठी त्यांनी समिती तयार केली. झाडांची लागवड केली गेली. शिवाय त्यांची निगाही राखली गेली. एकीकडे ओसाड असलेल्या या जमिनीवर बघता बघता जंगल तयार केले. ११०० हेक्टर जंगलाची निर्मिती झाली. याचे सर्व श्रेय पवार यांचे होते. त्यासाठी त्यांनी गावकऱ्यांची मदत घेतली. त्यांच्यात जागृती निर्माण केली. त्यांना जंगलाचं महत्व पटवून दिलं. त्यांच्या या लोक चळवळीची दखल महाराष्ट्रानेच नाही तर जगाने घेतली होती. जगातील ७८ देशांमध्ये चांगले गाव कसे असावे? याविषयी झालेल्या तज्ज्ञांच्या सव्र्व्हेमध्ये बारीपाडाने दुसरा क्रमांक मिळवला होता. त्याचबरोबर बारीपाडा प्रकल्पास अत्यंत मानाचा समजला जाणारा खक्र-ऊ या आंतरराष्ट्रीय संस्थेचा पुरस्कार मिळाला होता. त्यांनी करुन दाखवलेल्या या कार्याचा गौरव महाराष्ट्र सरकारने ही केला होता. चैत्राम पवार यांना महाराष्ट्राचा पहिला वनभुषण पुरस्कार देण्यात आला. जवळपास ११०० हेक्टर वनक्षेत्राचे त्यांनी संरक्षण केले होते. १९९० च्या दशकात संयुक्त वन व्यवस्थापन प्रभावीपणे राबवून ११०० हेक्टर जंगलाचे संरक्षण केले. स्वतःच्या प्रयत्नांनी त्यांनी जवळपास ५,००० हून अधिक झाडे लावली होती. जैवविविधतेचे संवर्धनाच्या माध्यमातून ८ दुर्मीळ प्राणीप्रजाती, ४८ पक्षीप्रजाती, व ४३५ झाडे, वेली, व झुडुपांच्या प्रजातींना आश्रय दिला.मृदा व जलसंधारणातही त्यांनी काम केलं. समाजाच्या सहकार्यातून ४८५ लहान बंधारे, ४० मोठे बंधारे बांधले ५ किलोमीटर कंटिन्युअस कंटूर ट्रॅचेस (उउढ) तयार करून धुळे जिल्ह्यात भूगर्भजल पातळी मोठ्या प्रमाणात वाढवली होती. बारिपाडा गावात झइठ म्हणजेच पिपल्स बायोडायव्हर्सिटी रजिस्टर उपक्रम राबवून पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण केले. नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पर्यावरणीय वारसा जपण्यासाठीचा आदर्श त्यांनी निर्माण केला. त्याच बरोबर महाराष्ट्र व गुजरातमधील १०० हून अधिक गावांत आदिवासी विकास, पर्यावरण संरक्षण, आणि शाश्वत विकासासाठी त्यांनी योगदान दिले आहे. पुरस्कार वितरणस्थळी दिल्ली येथे बारिपाडासह परिसरातील २५ ते ३० महिला व पुरुष दिल्ली दरबारी गेले असल्याचे समजते

# नीट'मुळे विधि तीन वर्ष अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षेत बदल..., आता परीक्षा ४ मेऐवजी २ मे रोजी होणार...

ओम सोमवंशी
मुंबई प्रतीनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने ३ व ४ मे रोजी विधि तीन वर्षे अभ्यासक्रमाची सीईटी घेण्याा निर्णय घेतला होता. या परीक्षेसाठी सीईटी सेलने आरक्षित केलेली सरकारी महाविद्यालयांमधील परीक्षा केंद्र ही ४ मे रोजी होणाऱ्या नीट परीक्षेसाठी राष्ट्रीय चाचणी संस्थेो आरक्षित केली आहेत. नीट ही राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा असल्याने ४ मे रोजी हाेणारी विधि अभ्यासक्रमाची सीईटी २ मे रोजी घेण्याचा निर्णय राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने घेतला आहे. तसेच विद्यार्थ्यांना २ मे रोजी होणाऱ्या परीक्षेबाबत प्रवेश पत्र पाठविण्यात आले आहेत. राष्ट्रीय चाचणी संस्थेतर्फे संपूर्ण देशामध्ये ४ मे रोजी नीट परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेसाठी एनटीएने राज्यातील सरकारी महाविद्यालयांमधील काही जिल्हा परीक्षा केंद्रे आरक्षित केली आहेत. ही परीक्षा केंद्रे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने विधि तीन वर्षे अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आरक्षित केली होती. एनटीएने नीट परीक्षेसाठी राज्यातील २८ परीक्षा केंद्र आरक्षित केली आहेत. एनटीएकडून आरक्षित केलेल्या परीक्षा केंद्रांची माहिती २२ व २३ एप्रिल रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाला मिळाली. नीट ही देशपातळीवरील परीक्षा असल्याने सीईटीसाठी या केंद्रांचा वापर करता येणार नाही. आरक्षित केलेल्या परीक्षा केंद्रामुळे जवळपास ८ ते ९ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे मे २०२५ मध्ये राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयीन परीक्षा सुरू होणार आहेत. त्यामुळे विधि तीन वर्षे अभ्यासक्रमाची सीईटी पुढे ढकलणे शक्य नाही. सीईटीच्या तारखा पुढे ढकलल्यास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला विलंब होऊ शकतो आणि त्यामुळे विधि महाविद्यालये विलंबाने सुरू होण्याची शक्यता आहे. विधि तीन वर्षांच्या सीईटी २०२५ परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या सुमारे ९५ हजार इतकी आहे. त्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे केंद्र मिळावे यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने ४ मे रोजी होणारी विधि तीन वर्षे अभ्यासक्रमाची सीईटी २ मे रोजी घेण्याचा निर्णय घेतला आहे. तर ३ मे रोजी होणारी सीईटी ही नियोजित वेळापत्रकानुसार होणार असल्याचे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी सांगितले.

### लॉगिन आयडीवर प्रवेश पत्र उपलब्ध

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियोजित वेळापत्रकानुसार ३ मे रोजी ३८ हजार, तर ४ मे रोजी ५७ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येणार होती. मात्र नव्या वेळापत्रकानुसार ४ मे रोजी होणारी परीक्षा २ मे रोजी होणार आहे. साधारण ५७ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा २ मे रोजी होणार आहे. या सर्व विद्यार्थ्यांना २८ एप्रिल रोजी दुपारी २ नंतर त्यांच्या लॉगिन आयडीवर प्रवेशपत्र पाठविण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांना समाज माध्यमांद्वार सूचना

विद्यार्थ्यांना नियोजित वेळापत्रकात बदल करण्यात आल्याची माहिती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने एसएमएस, व्हॉट्स ॲप, नोंदणीकृत ई-मेल आयडी, संकेतस्थळावर जाहीर सूचना या माध्यमातून देण्यात आल्याचे दिलीप सरदेसाई यांनी सांगितले.

### परराज्यातील विद्यार्थ्यांची ३ मे रोजी परीक्षा

परराज्यातून सीईटी परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना तिकिट आरक्षणाबरोबरच राहण्याची आगाऊ व्यवस्था करावी लागते. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा त्रास वाढू नये यासाठी परराज्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा ३ मे रोजी घेण्यात येणार असल्याचे दिलीप सरदेसाई यांनी सांगितले.

### सीए, सीएसची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा

सीए व सीएसची परीक्षा ४ मे रोजी होणार होती. विधि तीन वर्ष अभ्यासक्रमाची सीईटी याच दिवशी होणार होती. त्यामुळे विधि तीन वर्ष अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षेत बदल करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. आता करण्यात आलेल्या बदलानुसार सीए, सीएसची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

# ताहाराबाद विद्यालयाचा इयत्ता ११ वी च्या सर्व शाखांचा शंभर टक्के निकाल

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------







ताहाराबाद येथील मविप्र संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज, ताहाराबाद विद्यालयाचा इयत्ता अकरावीच्या सर्व शाखांचा निकाल जाहीर करण्यात आला. विशेष बाब म्हणजे इयत्ता अकरावीच्या सर्व शाखांचा निकाल हा शंभर टक्के लागला. ताहाराबाद विद्यालयाने दिलेल्या माहितीनुसार विज्ञान शाखेतील विद्यार्थी साक्षी भामरे प्रथम, तनुजा भामरे द्वितीय तसेच तन्वी साळवे हिने तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये नेहा साळवे प्रथम, दिव्या झगडे द्वितीय तसेच माधुरी देवरे हिने तृतीय क्रमांक पटकावला. त्याचबरोबर कला शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये खुशी खरे हिने प्रथम, पूजा गवळी द्वितीय तसेच चेतना भामरे हिने तृतीय क्रमांक पटकावला. विशेष क्रमांकाने पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचा विदयालयचे प्राचार्य डी. ए. डावरे, उपमुख्याध्यापिका श्रीमती आर. आर. सोनवणे , उपप्राचार्य श्री सुनील देशमुख, पर्यवेक्षक श्री. बी. आर जगताप यांच्या हस्ते बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ज्युनिअर कॉलेज विभागाचे शिक्षक ए. एम. ठाकरे, पी. डी. नेरकर,चौधरी डी. डी., देवरे के. व्ही, भडांगे के.डी, पवार व्ही.के, गांगुर्डे एस. जे, उमेश निकम, निखिल सोनवणे, प्रवीण धोंडगे आधी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन अभिजीत गोसावी यांनी केले.

# श्री मंगल कार्यालय सटाणा येथे ब्राह्मण समाजातर्फे भगवान परशुराम जयंती साजरी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------






दिनांक २९ ५ २०२५ मंगळवार रोजी सटाणा येथे ब्राह्मण समाजातर्फे भगवान परशुराम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष बापू जोशी व संचालक श्री बिंदू शेठ शर्मा तसेच सर्व संचालक बांधव यांनी भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. यावेळेस समाज बांधव श्री चिंधडे नाना डॉक्टर, शेखर मुळे, परिमल जोशी, प्रीतम पाठक, शुभम पाठक, मिलिंद पाठक, रूपाली पंडित, शर्मिला कुलकर्णी, पाठक बापू, जोशी धनंजय पंडित, राजू पंडित, इनामदार गजानन जोशी, धनंजय पंडित, चिंधडे, बिंदू शेठ शर्मा, मंगेश शुक्ल, शेखर मुळे, मकरंद पाठक, अनंत चंद्रात्रे, विशाल जोशी, तुषार गोसावी, चेतन कुलकर्णी, वैशाली जोशी, रूपाली पंडित, लीना जोशी व बागलान पुरोहित संघ हजर होते.

# अक्षय तृतीया : आजचे बदललेले स्वरूप





भारतीय संस्कृतीत अनेक सण, उत्सव आणि धार्मिक परंपरा आहेत, ज्यांनी समाजाच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक जीवनाला आकार दिला आहे. त्यातील एक महत्त्वाचा सण म्हणजे अक्षय तृतीया. 'अक्षय' म्हणजे कधीही संपुष्टात न येणारा – कायम राहणारा. म्हणूनच या दिवशी केलेल्या पुण्यकर्माचे, दानाचे, वा उपासनेचे फळ 'अक्षय' म्हणजे नाशरहित असल्याचे मानले जाते. परंतु आजच्या गतिमान, भौतिकतावादी जीवनशैलीत या सणाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. या निबंधात आपण अक्षय तृतीयेच्या पारंपरिक स्वरूपाची झलक घेत त्याच्या आजच्या बदललेल्या स्वरूपावर सविस्तर चर्चा करूया.

### अक्षय तृतीयेचा पारंपरिक संदर्भ

अक्षय तृतीया हा हिंदू पंचांगानुसार वैशाख शुद्ध तृतीया या दिवशी साजरा होतो. हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. अनेक धार्मिक आणि पौराणिक कथा या दिवसाशी संबंधित आहेत.

या दिवशी भगवान विष्णूचे सहावे अवतार परशुराम यांचा जन्म झाला, अशी श्रद्धा आहे.

महाभारतातील अक्षय पात्र पांडवांना या दिवशी मिळाले.

या दिवशी गंगा अवतरण झाल्याचा उल्लेख काही पुराणांमध्ये आहे.

जैन धर्मातही या दिवशी भगवान ऋषभदेवांनी दीक्षा घेतल्यानंतर पहिले पारणे (भोजन) घेतले.

या सर्व घटना या दिवसाला धार्मिकदृष्ट्या अत्यंत पवित्र ठरवतात. त्यामुळेच पारंपरिक स्वरूपात या दिवशी लोक जप-तप, व्रत, तीर्थस्नान, होमहवन, व्रताचार, दानधर्म, गरीबांना अन्नवाटप, गायींना चारा, पाणपोई उभारणे, कावळ्यांना पाणी ठेवणे यासारख्या पुण्यकर्मात गुंतलेले असायचे.

### आजचे बदललेले स्वरूप

कालांतराने विज्ञान, तंत्रज्ञान, बाजारपेठेचा प्रसार आणि भौतिक जीवनशैलीच्या प्रभावामुळे अक्षय तृतीया या सणाचे स्वरूप झपाट्याने बदलले आहे. धार्मिकतेऐवजी व्यावसायिकता, प्रदर्शन आणि सोशल मीडिया संस्कृती यांचे प्रभाव अधिक दिसून येतात.

### १. सणाचे व्यावसायिकीकरण

आज अक्षय तृतीया हा सोने खरेदीचा दिवस म्हणून प्रसिद्ध झाला आहे. ज्वेलर्स, बँका, गुंतवणूक कंपन्या या दिवसाचे व्यावसायिक महत्त्व अधोरेखित करतात. 'या दिवशी केलेली गुंतवणूक कधीही कमी होत नाही' असा संदेश सतत दिला जातो. परिणामी अनेक जण याच दिवशी सोनं, चांदी, शेअर्स, फ्लॅट्स, वाहने इत्यादींची खरेदी करतात. त्यामुळे अक्षय तृतीया 'पुण्य' करण्याचा दिवस राहून सामाजिक प्रतिष्ठेच्या प्रदर्शनाचा दिवस झाला आहे.

### २. धार्मिकतेपेक्षा बाह्य आडंबराला प्राधान्य

पूर्वीच्या काळी ही तृतीया दानधर्म आणि आध्यात्मिक शुद्धतेसाठी ओळखली जायची. आज मात्र सोशल मीडियावर फोटो टाकण्यासाठी पारंपरिक पेहराव, पूजा, व्रत आणि शॉपिंगचे देखावे करण्यात येतात. प्रत्यक्षात अशा कृतींचा मूळ धार्मिक हेतू हरवतो. फोटो-centric आणि likes-centric जीवनशैलीमुळे या दिवशी धार्मिकतेपेक्षा बाह्य रूप महत्त्वाचे ठरते.

### ३. मूल्यांच्या जागी मार्केटिंग

आज सणांभोवती एक 'मार्केटिंग इकोसिस्टम' उभी राहिली आहे. अक्षय तृतीया हे त्याचे उत्तम उदाहरण. विविध जाहिराती, सवलती, एकदिवसीय ऑफर्स अशा माध्यमातून लोकांमध्ये खरेदीसाठी हाव निर्माण केली जाते. मूळ हेतू असलेल्या दानधर्माऐवजी स्वतःच्या घरासाठी वस्तू खरेदी करणे, याकडे अधिक कल दिसून येतो.

### ४. दानधर्माची संकल्पना बदलली

पूर्वी पाणी, अन्न, वस्त्र, औषधे यांचे दान गरजूंपर्यंत पोहोचवले जाई. आजच्या काळात 'दान' ही संकल्पना NGO ला ऑनलाइन पैसे ट्रान्सफर करणे इतकी मर्यादित झाली आहे. प्रत्यक्ष सेवा, व्यक्तिसंबंधित दया-करुणा यांचा अभाव दिसतो. तसेच, काही जण हे दानदेखील केवळ करसवलतीसाठी करतात, हा एक नवा बदल आहे.

### ५. शेअर बाजार आणि गुंतवणुकीची जोड

आज या दिवसाला गुंतवणुकीच्या शुभदिनीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शेअर बाजारात डीमॅट खाती उघडणे, म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणे, सोन्याचे ETF खरेदी करणे यासारख्या आर्थिक उपक्रमांना जोर दिला जातो. धार्मिक सण आर्थिक संधी म्हणून पाहिला जातो.

### ६. ग्राम्य परंपरांचा लोप

पूर्वी गावात सामूहिक होमहवन, गायींना खळ्यात नेणे, सार्वजनिक पाणपोई उभारणे, गावकुसाबाहेर वटवृक्षाजवळ पूजा अशा परंपरा असायच्या. आज त्या लोप पावत चालल्या आहेत. त्याऐवजी शहरी जीवनशैलीत मॉलमधील खरेदी आणि सोशल मीडिया पोस्ट हेच केंद्रबिंदू झाले आहेत.

### बदलांचे सकारात्मक पैलू

हे सर्व बदल नकारात्मक आहेत असं म्हणणं योग्य नाही. काही सकारात्मक बदलही झाले आहेत:

सामाजिक जाणीव जागी होणे: काहीजण या दिवशी अनाथाश्रमात अन्नदान, वृध्दाश्रमात भेट देणे, NGO ला मदत करणे यासारखी सामाजिक सेवा करत आहेत. ऑनलाइन दान: तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रामीण भागांपर्यंत दान पोहोचवणे सहज शक्य झाले आहे. साक्षरतेची वाढ: लोक अक्षय तृतीयेचा अर्थ, इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. महिला सक्षमीकरण: सोनं खरेदी करताना महिलांचा सहभाग वाढला असून त्यातून त्यांचे आर्थिक नियोजन सक्षम झाले आहे. उपसंहार अक्षय तृतीया या सणाचे स्वरूप काळानुसार बदलले असले तरी त्याचा मूळ हेतू – पुण्य, दानधर्म, आणि आत्मिक उन्नती – विसरता कामा नये. फक्त भौतिक वस्तूंची खरेदी करून किंवा सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून हा सण साजरा होतो असे मानणे ही चुकीची समजूत आहे. आपल्याला याच निमित्ताने परंपरेतील शाश्वत मूल्ये पुन्हा एकदा आठवून त्यांना आपल्या जीवनशैलीत रुजवण्याची आवश्यकता आहे. सण साजरे करणे ही आपल्या संस्कृतीचा भाग आहे, पण त्यात अंतःकरणाची पवित्रता, सेवाभाव आणि आत्मिक शुद्धीकरण असेल तरच त्या सणाचे खरे 'अक्षय' स्वरूप टिकून राहील.